# शैक्षणिक थिंक टँक आटला नसून अडवण्यात आला आहे

शिक्षण हक्क कायद्यामुळे परीक्षा घेता येत नसल्यामुळे राज्यातील शिक्षणाचा दर्जा घसरत चाललेला आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्राचे शिक्षण सचिव श्री. सुमित मलिक यांनी २१ जुलै रोजी एका सभेमध्ये केले आहे. या समस्येवर मात करण्यासाठी शिक्षणहक्क कायद्यामध्ये बसेल अशी गुणवत्ता मूल्यमापन योजना राज्यात राबवण्यात येईल, अशी घोषणा त्यांनी केली.

सदर लेखात मी शिक्षण सचिवांच्या भूमिकेवर टीका करीत असले तरी हे मान्य करावे लागेल की केंद्राच्या आठवीपर्यंत नापास न करण्याच्या धोरणामुळे काही समस्या निर्माण होतात. मुख्यतः एका विशिष्ट इयत्तेचा अभ्यास न येता एखाद्या विद्यार्थ्याला पुढच्या इयत्तेत ढकलले तर त्याच्यावर अन्याय होतो. हे होत राहिले तर शेवटी आठवीमध्ये तो फारच मागे राहील व शाळा सोडण्याशिवाय त्याला दुसरे गत्यंतर नसेल. या धोरणाबाबत निश्चितपणे केंद्राशी वाटाघाटी करणे गरजेचे आहे. मात्र सदर लेखात शिक्षण सचिवांची भूमिका वेगळ्या दृष्टीने मी पाहू इच्छिते.

“शिक्षणाचा दर्जा घसरत चाललेला आहे” या विधानाचा विचार मला प्रथम करायचा आहे. या विधानाचा अर्थ असा आहे की काही वर्षांपूर्वी आपल्याकडील शिक्षणाचा दर्जा चांगला होता. मात्र हे खरे नाही. सन १९८९-१९९० साली मी पश्चिम महाराष्ट्रातील इयत्ता तिसरीमधल्या मुलांच्या मूलभूत साक्षरतेची पहाणी केली होती. अक्षरज्ञान, सोपे शब्द व दोन सोपी वाक्ये अशी ८५ गुणांची परीक्षा होती. म्हणजे इयत्ता पहिलीत अपेक्षित असलेली कौशल्ये एवढीच समाविष्ट होती.

ही परीक्षा १ खाजगी, १२ नगर परिषद व १३ जिल्हा परिषद शाळांमध्ये घेतली होती. मुलांची संख्या एकूण १६१८ होती. या पहाणीमध्ये असे दिसून आले की ५० टक्के तिसरीतील मुलांना मूलभूत साक्षरतेची कौशल्ये नव्हती. खाजगी शाळेच्या मुलांचे गुण बाजूला ठेवले तर निकाल आणखी विदारक होता. जिल्हा परिषद शाळांमध्ये केवळ ४४.८२ टक्के मुलांचे गुण ७६ ते ८५ दरम्यान होते व नगर परिषद शाळांमध्ये फक्त ३१.१० टक्के मुलांचे गुण ७६ ते ८५ च्या दरम्यान होते. म्हणजे जिल्हा परिषद शाळांमध्ये इयत्ता तिसरीतील साधारण ५५ टक्के मुलांनी इयत्ता पहिलीची साक्षरतेची कौशल्ये संपादित केली नव्हती.

या पाहणीच्या अहवालाला मी *Collapse at the Foundation – पायापाशीच पडझड*-- असे शीर्षक दिले होते. थोडक्यात या पाहणीवरून (व इतर अनेक पुराव्यांवरून) असे सिध्द होते की मुलांना लिहिता-वाचता न येणे ही आजचीच समस्या नसून ती फार जुनी आहे. तिची मुळे खूप खोलवर गेली आहेत. केवळ अलिकडे परीक्षा घेतली जात नाही, हे कारण नव्हे.

निदान चुकीचे असेल तर मात्राही चुकणारच, हे उघड आहे. आजची गरज चाचण्या, परीक्षांचा भडीमार नव्हे. मुले पाहिजे तितक्या प्रमाणावर लिहायला-- वाचायला अयशस्वी का होतात याबद्दल सरकारतर्फे वस्तुनिष्ठ व सुस्पष्ट विचार ही खरी गरज आहे. या अपयशाला शिक्षक कितपत जबाबदार आहेत? माझ्या अनुभवावरून मी सांगू शकते की सरकारी शाळांमध्ये बहुसंख्य शिक्षक प्रामाणिकपणे काम करतात-- नाना प्रकारच्या अडचणी असताना सुध्दा. मग आस्था, तळमळ असूनही ते यशस्वीपणे सर्व मुलांना लिहायला-वाचायला शिकवू शकत नाहीत, याचे कारण काय?

मातृभाषा शिक्षण एक शास्त्र आहे. मात्र ते शास्त्र शिक्षकांना कधी शिकवले नाही-- ना सेवापूर्व प्रशिक्षणात, ना सेवांतर्गत शिक्षणात. शिवाय पाठ्यपुस्तकेही स्पष्ट सैध्दांतिक विचारावर आधारित नसतात. मूलभूत सिध्दांत समजत नसल्यामुळे व पाठ्यपुस्तकातून दिशा मिळत नसल्यामुळे शिक्षक आपापले मार्ग शोधतात. जे शिक्षक विशेष कल्पक, कुशल व संवेदनशील असतात त्यांना बऱ्यापैकी यश मिळते. मात्र अनेकजण पर्याय दिसत नसल्यामुळे अत्यंत यांत्रिकपणे शिकवतात आणि वर्गातील मुले मागे पडतात.

## प्रगत शिक्षण संस्थेचा प्रकल्प

गेल्या दोन दशकांपासून फलटणच्या प्रगत शिक्षण संस्थेने अनेक जिल्हा परिषद शाळांमध्ये इयत्ता पहिलीत वाचन-लेखन सुधार प्रकल्प अत्यंत यशस्वीपणे राबवला आहे. या प्रकल्पात आम्ही विकसित केलेली "प्रगत-वाचन पध्दती" व *आपण वाचू या* हे छोटे पुस्तक वापरण्यात येत आहे .

मागच्या दोन वर्षांमध्ये या प्रकल्पास सर रतन टाटा ट्रस्ट व इतरांचे आर्थिक सहाय्य मिळत होते व NCERT च्या डॉ. संध्या परांजपे यांच्याकडून बाह्य मूल्यमापन झाले. ज्या २२ शाळांमध्ये प्रगत शिक्षण संस्थेने काम केले त्यातील ४ शाळा randomly निवडून त्या विद्यार्थ्यांचे मूल्यमापन केले. त्यांचा निष्कर्ष असा होता की, शाळांची सरासरी टक्केवारी ८९ ते ९४ होती. किंबहुना प्रगत शिक्षण संस्थेच्या मूल्यमापनामध्ये साधारण हाच निकाल लागला. एकूण इयत्ता पहिलीतील मुले खरोखर साक्षर झाली होती.

तांत्रिक दृष्टीने baseline test (पूर्वपरीक्षा) न घेतल्याने हे यश पूर्णतः प्रगत वाचन पध्दतीमुळे झाले असे आपण म्हणू शकत नाही. मात्र व्यावहारिक दृष्टीने हे उघड आहे की या पध्दतीमुळे मुले लिहायला वाचायला शिकतात.

हे काम करण्यासाठी प्रगत शिक्षण संस्थेला सरकारची परवानगी मिळते व यशाबद्दल थोडीफार शाबासकीही मिळते. पण या पध्दतीचे खुल्या मनाने विश्लेषण होत नाही, ही खेदाची बाब आहे. प्रस्थापित सरकारी यंत्रणेची पकड इतकी असते की अमूलाग्र बदल करणे जवळजवळ अशक्य असते.

काही महिन्यांपूर्वी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेतर्फे अनेक शिक्षक व तज्ज्ञ मंडळी एकत्र आले. नवीन वारे वाहू लागले. प्राथमिक शिक्षणामध्ये परिवर्तन घडणार आहे, अशी आशा प्रफुल्लित झाली. पण प्रस्थापित संस्थांकडून इतका विरोध झाला की या विचार मंथनातून काहीतरी निष्पन्न होईल की नाही, हे अद्याप सांगता येत नाही.

मा. मुख्यमंत्री श्री. पृथ्विराज चव्हाण यांनी नुकत्याच एका लेखात लिहिले होते की आज महाराष्ट्र देशाचे वैचारिक नेतृत्व करीत नाही; आपला थिंक टँक आटला आहे. मात्र वस्तुस्थिती अशी नाही. ज्ञान, अनुभव व बांधिलकी असलेला मोठा सागर उपलब्ध आहे. परंतु प्रस्थापित सरकारी यंत्रणेकडून तो अडवण्यात आला आहे, धरणाचे दरवाजे खोलले तर त्या सागरामधून नवा ताजा जीवनदायी प्रवाह वाहू शकेल.

**डॉ. मॅक्सीन बर्नसन**

**संचालिका**

प्रगत शिक्षण संस्था

Centre for Laguage, Literacy and Communication

maxineberntsen@gmail.com

जुलै २५, २०११